Impact Factor – 6.261 | Special Issue - 162 C | Mar. 2019 | ISSN – 2348-7143
UGC Approved Journal List No. 40705

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

# WOMEN EMPOWERMENT AND SCIENTIFIC CHANGE

- EXECUTIVE EDITOR OF THIS ISSUE -
**Dinesh R. Jaronde**

- CHIEF EDITOR -
**Dr. Dhanraj T. Dhangar**

Printed By : **PRASHANT PUBLICATIONS, JALGAON**

For Details Visit To : www.researchjourney.net

Scanned with CamScanner

Impact Factor – 6.261 ▪ Special Issue - 162-C ▪ Mar. 2019 ▪ ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

**RESEARCH JOURNEY**

UGC Approved Journal

Multidisciplinary International E-research Journal

# WOMEN EMPOWERMENT AND SCIENTIFIC CHANGE

... Executive Editor of this Issue ...

**Dinesh R. Jaronde**

... Chief Editor ...

**Dr. Dhanraj T. Dhangar**

*Printed by :* PRASHANT PUBLICATIONS, JALGAON

Scanned with CamScanner

ISSN : 2348-7143
March 2019

# : CONTENTS :

## English

1. **African Women's Issus : A Perspective on the Novel "The Bride Price" by Buchi Emecheta** ........ 1
Ms. Drakshamala Bhagwan Jawale, Dr. Ramesh N Dhage
2. **Historical Succesfull Womens** ........ 4
Mrs. Swati Shekhar Joshi
3. **Ayurveda For Women's Health** ........ 7
Dr. Pradnya B. Gurde (Jamdhade), Dr. Subhash B. Jamdhade
4. **Empowerment of Rural Women Through Self Helf Groups – A Study** ........ 9
Dr. B. Perundevi,
5. **Dr. Babasaheb Ambedkar's Contribution To Women Liberation And Empowerment** ........ 12
Dr. Panchappa Ramchandra Waghmare
6. **Oppression of Women in The Three Novels of Amulya Malladi** ........ 14
Kishor Nanaji Mahajan
7. **Status of women in Indian classical Music** ........ 17
Miss Ketakee Ingle
8. **Historical Perspective on Gandhian Philosophy for the Emancipation of Women** ........ 19
Dr. Prakash Masram
9. **Compensatory Justice for Women Victims in India : A Review** ........ 22
Sandeep C. Nagarale
10. **Educational Empowerment of Muslim Women in India ; Fallacy and Reality** ........ 25
Shafeek P., Dr. Hassankoya. M. P.
11. **Women Empowerment & Domestic Violence** ........ 28
Kalpana K. Patel
12. **Vitamin $D_3$ And Women's Health** ........ 30
Dr. Vishakha Kayande
13. **First Indian Women Teacher : Savitribai Phule - A Study** ........ 33
Kavi Ezhil N.
14. **Portrayal of Women in Indian Cinema and Their Changing Roles : Then & Now** ........ 36
Prof. Sameer Naim
15. **Leadership and Women** ........ 39
Dhanshree Patrikar
16. **Implementation of Rights of Persons With Disabilities Act, 2016** ........ 41
Kuntal Dutta
17. **Corruption In Arvind Adiga's The White Tiger** ........ 46
Rupesh S Wankhade
18. **Advent of Buddhism in Ladakh from Kashmir and Tibet** ........ 48
Tsering Angchok
19. **Role of Tourism in Economic Development of India** ........ 51
Prof. Rajat R. Mandal
20. **Female Education in The City of Madras 1917- 1967** ........ 55
Dr. S. Sudarkodi
21. **Impact on The Knowledge and Attitude of Women Towards Obesity Information on Media: An Exploratory Study** ........ 58
S.Shanmuga Nathan, Dr. S. Arulchelvan
22. **A Study of Environmental & Green Chemstry** ........ 61
Jayshree P. Morey



Scanned with CamScanner

23. An Exploration Study on The Preferences of Tamilnadu Women Amongst The Categories of Mobile Applications ........ 64
S. Suganya, M. Rajarajeshwari, Dr. C.Velayutham

24. Framing India's Constitution - Ambedkar's Momentous Contribution ........ 67
Dr. B. Gopal Naik

25. Conception of Women As A Subject In The Philosophy of Julia Kristeva ........ 70
Harsimran Kaur

26. Mobile and Dynamic Life ........ 74
Ms. Nikita H. Vidhale

27. Review : Synthesis and Anti-diabetic Evaluation of New Heterocycles ........ 77
Mr. Gautam P. Sadawarte

28. Simple and Rapid Synthesis of 2,4,5-trisubstituted Imidazoles ........ 81
R. M. Kedar

29. Crime against Women in India ........ 84
Dr. Anjna Malhotra

30. Violence on Women : A Design of the Divine ........ 87
Dr. Leena B. Chandnani

31. Work Participation Rate of Women in Amravati District ........ 89
Deepak Udayraj Ambore

32. Scenario of Women Development ........ 92
Dr. Mahesh P. Chougule

33. Women Empowerment: A Significant Step to Enhance Women Status in India ........ 95
Dr. Meenakshi Madaan

34. Effect of Socioeconomic Conditions and Lifestyles on Reproductive Health and Hygiene of Rural Women : A sociological Analysis ........ 98
Shalini Patel

35. Does the Government and NGO's are Really Helping the PwD's to Improve their Socio-Economic Status – A Study on Garladinne Mandal in Drought Prone District ........ 101
M.Nagaraju

36. Contribution of Tourism Industry in Indian Economy ........ 105
Mr. Ashish Bhasme

37. Male sterilization : A prerequisite in 21st century ........ 107
Ms. Komal R. Oswal

38. Water Pollution and its adverse effects on living organism - Review ........ 109
Dr. Pradeep Randiwe

39. Changes in Income and Quality of Life of Person with Disabilities (PwDs) Through Income Generating Activities by Govt. and NGO's – A Study in Kalyadurgam Mandal in Anantapuramu District ........ 112
M. Nagaraju

40. Trends in Higher Education - Digital Education & Virtual Classrooms ........ 116
Dr. Deshpande Manisha P.

## मराठी

४१. !! स्त्रियांचे अधिकार व मानवी हक्क!! ........ ११९
डॉ. अरविंद सोमनाथे

४२. महिलांच्या जागतिक इतिहासातील एक क्रांतीकारी घटना–स्त्रियांची धम्मदीक्षा ........ १२२
आम्रपाली गोविंदराव तिरपाळे

४३. भटक्या विमुक्त जमातीतील महिलांची स्थिती – एक दृष्टीक्षेप ........ १२५
श्रीमती संध्या जयसिंग माने, डॉ. विजय जयसिंग माने

४४. भारतीय राजकारणातील सक्षम महिला नेतृत्व: बहन मायावती ........ १२८
प्रा. डॉ. अशोक जाधव



Scanned with CamScanner

४५. भारतीय स्त्रीयांच्या सक्षमीकरणात संविधानाचे योगदान ........ १३२
प्रा.मनोज सोनटक्के, प्रा.डॉ.मिलींद भगत
४६. सक्षम महिला आणि राजकारण ........ १३५
प्रा. डॉ. विठ्ठल गो. चव्हाण
४७. महिलांचे आर्थिक सबलीकरण एक विवेचन ........ १३७
प्रा. डॉ.अपर्णा अ. पाटील
४८. मानवी अधिकार व महिला ........ १३९
डॉ. विजय टोंगे
४९. स्त्री सक्षमीकरणाचा ऐतिहासिक आढावा ........ १४१
कु. प्रिया प्रकाशराव इंझळकर
५०. ग्रामिण महिला व सक्षमिकरण क्षेत्रे ........ १४४
प्रा. डॉ. दिवाकर एन. कामडी
५१. महिला आरोग्य प्रबोधन ही काळाची गरज ........ १४७
प्रा.डॉ.अर्चना आ. निखाडे
५२. आधुनिक भारतातील एक महान सेवाव्रती : साधनाताई आमटे ........ १४९
प्रा. डॉ. लखपती वा. गायकवाड
५३. स्त्रियांचे बदलते सामाजिक, राजकीय व कौटुंबिक स्वरूप ........ १५१
डॉ. सौ. एम. आर. वलीवकर
५४. कायद्यातील तरतुदी व महिला सक्षमिकरण ........ १५३
डॉ.बी.व्ही.डोंगरे (पाटील)
५५. नैतीकता आणि महिला सशक्तीकरण ........ १५६
डॉ. मोहन दे. वानखडे
५६. महाराष्ट्राच्या राजकारणातील महिलांचा सहभाग ........ १५९
डॉ. किशोर उत्तमराव राऊत
५७. महिला व राजकारण ........ १६२
प्रा. सौ. रायठक दिपमाला विश्वनाथ
५८. कौटुंबिक कलह सोडविण्यांत महिला तक्रार निवारण केंद्राची भूमिका ........ १६४
प्रा. डॉ. साधना डी. वाघाडे
५९. महिलांचे राजकारणात सहभाग ........ १६६
प्रा. डॉ. सुधाकर जावळे
६०. आंबेडकरी विचारदृष्टी आणि स्त्री मुक्ती ........ १६९
प्रा.डॉ. युवराज श्रीराम मानकर
६१. महिला सक्षमिकरण व कौटुंबिक हिंसाचार ........ १७३
प्रा. राजु दयारामजी चावके
६२. अहिंसा : गांधीचींचा विचार आशय ........ १७५
डॉ. माधव लक्ष्मणराव सोनेकर
६३. संत नरहरी सोनार ........ १७८
प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे
६४. महिला सबलीकरण एक आव्हान ........ १८१
प्रा. डॉ. दीपक आनंदराव चौरपगार
६५. महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार ........ १८३
प्रा.डॉ. गजानन रा. लोहवे
६६. ग्रामीण पर्यटन : संधी व आव्हाने ........ १८६
प्रा. निलेश दे. हलामी
६७. भारतीय अर्थव्यवस्थेवर काळया पैशाचा प्रभाव ........ १८८
प्रा.डॉ. जयेश मो. अवथरे
६८. बालकांचे हक्क आणि भीक मागणारी रस्त्यावरील मुले ........ १९१
निलेश रामराव मगर



Scanned with CamScanner

६९. निळ शेतकऱ्यांचा प्रश्न आणि म. गांधीचा सत्याग्रह ........ १९५
संदीप तुंडूरवार
७०. मुलभूत अधिकार आणि समाज ........ १९९
डॉ.बी.व्ही. डोंगरे (पाटील)
७१. महिला सशक्तीकरणामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका ........ २०१
गणेश वामन पाटील
७२. स्त्री–भ्रूणहत्येमागील मानसिकता बदलण्यासाठी राष्ट्रसंतांच्या विचारांची आवश्यकता ........ २०३
डॉ. सुषमा लोखंडे
७३. स्वातंत्र्य आंदोलनात अनुसयाबाई काळे यांचे योगदान ........ २०५
डॉ. प्रदिप शा. ढोले
७४. महिला सक्षमीकरण व महिलांचे अधिकार ........ २०७
सहा. प्रा. पुनम भुरे
७५. महिला सक्षमीकरण आणि संवैधानिक तरतूदी ........ २१०
प्रा.कल्पना एस.गोडघाटे
७६. विदर्भातील आदिवासी स्त्रियांच्या प्रगतीची दशा व दिशा ........ २१५
डॉ. भानुदास डी. जामनेकर
७७. महिला आणि मानवाधिकार ........ २१७
रंजना हरबाजी आडे
७८. मानवी हक्क आणि महिला ........ २२०
श्रीम. सिमा अरुण जत्राटकर
७९. नागपूर विभागातील जलसंपदा विभागातील सहकारी पतसंस्था ........ २२३
सोनु राजमन विश्वकर्मा

## हिंदी

८०. फिल्मी जगत में महिलाओं की भूमिका–संगीत के संदर्भ में ........ २२६
प्रभदीप सिंह
८१. शास्त्रीय संगीत के प्रचार–प्रसार में महिला गायक कलाकारों का योगदान : जयपुर घराने के विशेष संदर्भ में ........ २२७
डॉ. ठाकूर सिंघ
८२. बीसवीं शताब्दी के स्वतंत्रता–संग्राम में महिलाओं का योगदान ........ २३०
डॉ. अनुजा रानी गर्ग
८३. संसदीय लोकतंत्र – बजरिए हिंद स्वराज ........ २३४
डॉ.शंभू जोशी
८४. भारत में राष्ट्रवाद आधारित पर्यटन के अभिनव प्रयास, आवश्यकताएँ तथा सम्भावनाएं ........ २३७
रोहित शर्मा
८५. समाज के उत्थान में विज्ञापन का स्थान ........ २४०
डॉ. रोशनी पवार
८६. पद्म श्री सुरिन्दर कौर के गीतों द्वारा पंजाब का समाजिक–सांस्कृतिक दर्शन ........ २४३
डॉ. राजेश शर्मा
८७. महिला सशक्तीकरण ........ २४६
ज्योत्स्ना शर्मा

## संस्कृत

८८. आचार्यहरिभास्करकृत–परिभाषाभास्करग्रन्थे महाकविप्रयोगविमर्शः ........ २४९
संभाजी विठ्ठल पाटील



Scanned with CamScanner

**RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal** ISSN : 2348-7143
*Impact Factor (SJIF) - 6.261 | Special Issue 162-C :* Women Empowerment & Scientific Change March 2019

# निळ शेतकऱ्यांचा प्रश्न आणि म. गांधीचा सत्याग्रह

संदीप तुंडूरवार
पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख
श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर

**विषय प्रवेश :**

चंपारण सत्याग्रह गांधी आणि भारत या दोहोंच्याही दृष्टीने एक ऐतिहासिक घटना आहे. भारताच्या स्वातंत्र्य लढयाचा विशेषतः तिचा पाया विस्तृत करणारी एक महत्वपूर्ण घटना यथपर्यंतचे तिचे औचित्य नसून भारताच्या समग्र इतिहासात अनभिज्ञ असणाऱ्या साधनाचा यथोचित वापर करून बलाढय, अतिनियंत्रित राजसत्तेला लोकभावनेची दखल घेण्यास बाध्य केलेली एक अभूतपूर्व घटना होती. एका अर्थाने हे आंदोलन भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारे ठरले. या आंदोलनाला अनेक पैलू जसे आहेत, तद्वतच एका नव्या परंपरेची निर्मिती बीजे त्यात समाविष्ठ आहेत. गांधीच्या दृष्टिने सत्याग्रह साधनाचा प्रयोग द. आफ्रिकेतील प्रश्नाबाबत यशस्वी ठरलेला असला तरी भारतात या प्रयोगाला कितपत स्वीकारल्या जाईल व तसा मनोविग्रह भारतीय लोक कशा स्वरूपात स्वीकारतील याबाबत ते निश्चितच साशंक होते. या पार्श्वभूमीवर चंपारण सत्याग्रहाने रोवलेली बीजे स्वातंत्र्याच्या दिशेने भक्कम पायवाट रचणारी जशी राहिली त्याचप्रमाणे भारतीय जनमानसात आत्मस्फुर्ती जाणवणारी राहिली, चंपारणच्या संदर्भात गांधी म्हणतात, 'जे मी केलेत तो एक साधारण भाग होता मी घोषणा केली की माझ्या देशात इंग्रज लोक माझ्यावर हुकूमत गाजवू शकत नाही.' (महात्मा गांधी के संपूर्ण आंदोलन, प्रो. गोविंद आई भाया, रावत प्रकाशन, नई दिल्ली, २०१६, पृ.क्र. १२७) गांधीच्या मांडणीतील हा साधेपणा, प्रामाणिकपणा तेथील आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांना, शेतकरी मजूरांना पटला, आपल्या प्रश्नांची तड लावणारा, आपल्याला समजून घेऊन आपणही या व्यवस्थेचे एक अभिन्न भाग आहोत हे समजून घेणारे नेतृत्व त्यांना या निमित्ताने गवसल्याने गांधीना जसे वलय प्राप्त झाले त्याचप्रमाणे काँग्रेसप्रती आशावाद जागृत होणरी ती बाब होती. आतापर्यंत म्हणजेच १८८५ पासून चाललेली बहुतांश आंदोलने केवळ व्यासपीठावरून चालविल्या गेलीत, त्यातही शेतकरी, मजूर, शोषित, उपेक्षित, वंचित यांच्या वेदनांना त्याच्या विरोधातील अन्यायाला प्रत्यक्षपणे वाचा फोडण्यास फारसे यश वा तसे दमदार प्रयत्न झालेले नव्हते. चंपारण सत्याग्रह याबाबत पूर्णतः निराळे व वंचितांच्या आत्मप्रतिष्ठेला प्रतिष्ठित करणारे होते. भारताच्या प्रतलावर गांधी नेतृत्वाचा प्रारंभ वा तसे वातावरण या आंदोलनातून उभे झाले.

गांधी भारतात ९ जानेवारी १९१५ रोजी भारतात परत आले यावेळी काँग्रेसवर टिळक व त्यांच्या आक्रमक अनुयायांचा प्रभाव होता या स्थितीत गांधीना आपली नेतृत्व उभारणीची जमीन मिळण्याचा अवकाश प्राप्त होईल असे वातावरण वा स्थितीही नव्हती. त्यांचे राजकीय गुरू ना. गोपाळ गोखले यांनी राजकीय परिक्षेत्रात उतरण्यापूर्वी येथील लोकांची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थिती अभ्यासांवी, त्यांचे निरिक्षण करावे व तद्नंतरच प्रवेश करावा असे म्हटल्याने त्यांनी संपूर्ण भारताचा प्रवास करून हा देश येथील स्थितीचे आकलन केल्यानंतरच येथील जनमानसात स्वातंत्र्य, स्वराज्य प्राप्तीच्या दृष्टीने कसे वळविता येईल याचा विचार सुरू केला. चंपारण येथील उद्भवलेला प्रश्न त्यांना या दिशेने घेऊन जाणारे पाऊल वाटले व थेट त्यात उडी घेत स्वतंत्रपणे या प्रश्नाच्या सोडवणूकीकरीता झोकून दिले. अनपेक्षितपणाने आलेल्या या संधीचा गांधीना भारतीय राजकारणात भक्कमपणे पाया रोवून धरण्यास फायदा झाला, हे चंपारण आंदोलनाचे वास्तव होय. गांधीच्यांच शब्दात व्यक्त करावयाचे म्हटले तर 'लढयाला मी कधीही राजकीय स्वरूप येऊ दिले नाही. अंतिम उद्दिष्ट राजकीय असूनही प्रत्यक्ष अंगीकृत कार्यात राजकारणाला स्थान नाही. त्या गोष्टीला राजकीय स्वरूप दिल्याने हेही नाही व तेही नाही, अशी स्थिती होते आणि अशा तऱ्हेने विषयांतर न केल्याने दोन्ही सुरळीत चालतात.' (कहाणी चंपारण सत्याग्रहाची, जयंत दिवाण अक्षर प्रकाशन, मुंबई, २०१६, पृ. क्र. ६६)

**चंपारण प्राचिन व ऐतिहासिक पृष्ठभूमी :**

नेपाळच्या सीमांना भिडलेला हा भाग बिहारच्या उत्तरेकडे मोडणारा आहे. रामायणातील सीतेचे वडील राजा जनकाच्या प्रांताचा हा भाग म्हणून उल्लेखित आहे. या भागात जनक, राम, सीता, याज्ञवल्भ ऋषी, मैत्रेयी, गार्गी यांच्या कहाण्या विखुरलेल्या आहेत. रामनामाने पुनीत असलेली ही भूमी सम्राट अशोकाच्या शांती निर्मितीचे व भव्यदिव्य स्तुप व विहारांनी नटलेली कोरीव लेण्यांची भूमी म्हणूनही सुपरिचित आहे. येथील स्तुपावर प्राकृत व ब्राह्मी भाषेत कोरलेल्या वचनात 'धर्मद्वारा राज्य, धर्मानुसार शासन, धर्माद्वारा सुख, धर्माद्वारा रक्षा' यांची स्पष्टता आहे. प्राचीन व ऐतिहासिक कालखंडातील त्याचे स्थान लक्षात घेतले तर शोषणाच्या प्रश्नाने वेढलेल्या या भागाचे प्राक्तन कसे व किती बदलले याची प्रचिती येऊ लागते. मौर्य घराण्यानंतर गुप्त व त्यानंतर हर्षवर्धनाचे राज्य येथे राहिलेत. मुघल शासकाच्या कालखंडात हा प्रांत आग्रा, दिल्ली या सल्तनतीच्या ताब्यात राहिला. प्रसंगोपात त्यावरील वर्चस्व वा श्रेष्ठत्व बदलल्याचे स्पष्टतः दिसून येते. एकोणविसाच्या शतकापर्यंत येथील भूभाग नेपाळ राजाच्या अधिपत्याखाली होता. सुप्रसिध्द १८१४-१५ मधील इंग्रज - गुरखे यांच्या लढाईत कायमस्वरूपी तहानुसार ब्रिटिशांच्या ताब्यात आला व येथूनच येथील शेतकऱ्याच्या पिळवणूकीचा व दुर्देशाचा कालखंड सुरू झाला. एका कालखंडात सन्मान, शांती याचे प्रतिक असलेला भूभाग अन्याय, शोषण, अपमान, छळ, यांचे प्रतिक बनलेला दिसून येतो. उस व निळीच्या उत्पादनातून आलेली क्रूरपध्दती गांधीच्या सत्याग्रही आंदोलनाच्या समाप्तीनंतर संपली.

चंपारण्य १७९१ मध्ये चार मोठ्या जमीनदारीत वाटल्या गेले होते, ज्यामध्ये बेतीया, रामनगर, शिवहर, मधुबन यांचा समावेश



*Printed by* : PRASHANT PUBLICATIONS

Scanned with CamScanner

होता. एकट्या बेतीया भागात १७१९ गावांचा समावेश होता. प्रत्यक्ष जहागिरीत गावांची संख्या २५२, कोठीवाल्यांना दिलेली ५०३ गावे, तात्पुरत्या खंडाने दिलेल्या गावांची संख्या ९६४ होती. (कित्ता, पृ. क्र. ४७) या भूगोलावरून तेथील आवाका व भीषण शोषणाचे स्वरूप लक्षात येते.

**चंपारण्यातील निळ शेतीचा प्रश्न :**

बिहार व बंगाल प्रांतातील निळ उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांचा प्रश्न रासायनिक तंत्राचा शोध लागल्यानंतर अधिक उग्र बनला. कपडे वा अन्य वस्तूंच्या वापराबाबत जर्मनीने कृत्रीम रासायनिक रंगाची निर्मिती शोधून काढल्यानंतर ब्रिटिश वसाहतीत सक्तीने उत्पादित केल्या जाणाऱ्या निळीच्या उत्पादनावर मर्यादा येऊ लागली. बिहार प्रांतातील मोतीहार, चंपारण, बेतीया या भागात ब्रिटिशांच्या मोठमोठ्या कोठ्या होत्या. सर्व कोठीचे मालक शेतकऱ्यांकडून सक्तीने निळ उत्पादन करून घेत असत. चंपारण क्षेत्रात या वेठ पध्दतीला 'तीनकटीया' असे म्हटल्या जात असे. एक बिघा जमीनीपैकी म्हणजेच २० पैकी ३ भागात शेतकऱ्याने सक्तीने निळ पिकविणे बंधनकारक होते. जवळपास शतकभरापेक्षाही अधिक काळापासून सक्ती होती व याबाबत ब्रिटिश कायद्यापेक्षाही कोठी मालकांचे कायदे जे अवैध व शोषणवादी होती त्याचा प्रभाव अधिक होता. स्थानिक शासन व प्रशासनावर कोठीवाल्यांची पकड असल्याने त्यांचेच साम्राज्य या ठिकाणी चालायचे. स्व-स्वार्थाकरीता मिंधेपणा घेऊन जगणारी रचना भारतात पूर्वापारपासून इतकी भिनलेली आहे की एकूणच येथील इतिहासाचे वस्तुनिष्ठ विश्लेषण केल्यास बाहय आक्रमकांना येथे संधी स्थानिकांमुळे मिळाली. ब्रिटिश राजवटीत असे उन्मत कोठीवाल्यांचे प्रमाण निळीच्या क्षेत्रात सार्वत्रिक होते त्याचा स्फोट १९१६ च्या लखनौ येथील कॉंग्रेस अधिवेशनात झाला. प्रथमत: शेतकऱ्याच्या दूरावस्थासंबंधी त्यांच्या भीषण जगण्यासंदर्भात ठराव मांडल्या गेला. या ठरावाने कॉंग्रेस अधिवेशनातील विषय क्रम, महत्व, लोकसांगड याबाबत आमूलाग्र परिवर्तन झालेत, चंपारणचा प्रश्न जसा गांधी नेतृत्वाशी जोडल्या गेला, तद्वतच कॉंग्रेसची मर्यादित राजकीय भूमी बदलत जाण्यास वाव मिळाला हे सुध्दा यातील प्रमुख तत्व म्हणून लक्षात घेणे आवश्यक ठरते.

कृत्रिम निळीच्या निर्मितीमुळे येथील कारखानदारी आणि त्यांचे मालक यांच्यात नफा कमविण्याचे मुख्य शस्त्र बोथट झाल्याची भावना झाली. १९१२-१३ मध्ये ९१ हजार एकरात निळीची लागवड झालेली होती. १९१४ मध्ये केवळ ८ हजार १०० एकरापर्यंत ती मर्यादित झाल्याने या मालकांनी आपला नफा भरून काढण्याकरीता वाढीव खंडाचा एक प्रकार शोधून काढला, त्याला 'शहरबे' असे म्हटल्या जात असे. या मालकांनी निळ उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांची करारातून एकतर्फी मुक्तता केली व त्यासोबतच त्यांच्यावर जबरी खंडाची सक्ती केल्याने नव्याच प्रश्नांना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागल्याने येथील संपूर्ण परिसरात असंख्य संतापजनक प्रतिक्रिया उमटू लागल्या. राजकुमार शुक्ल, रामप्रसाद दयाल, ब्रजकिशोर बाबू यांनी कॉंग्रेस अधिवेशनाला हजेरी लावून येथील प्रश्न धसास लावण्याचे ठरविले. अधिवेशन स्थळी आल्यानंतर त्यांनी या प्रश्नाची भयावहता तेथील वस्तुस्थिती याबाबत लोकमन्य टिळक, पं. मदनमोहन मालवीय यांना पटवून देण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांना त्यात निराशा प्राप्त झाली. पं. मदनमोहन यांनी या प्रश्नाबाबत गांधीशी भेट घेण्याबाबत सूचविले व ते तुम्हाला मदत करू शकतील असेही स्पष्ट केले. राजकुमार शुक्ल, रामप्रसाद दयाल, ब्रजकिशोर बाबू गांधीना भेटलेत व चंपारण्यातील शेतकऱ्यांच्या दयनीय, अमानवीय वस्तुस्थितीबाबत त्यांना अवगत केलेत. गांधीनी प्रश्न नीट समजून घेतला त्यांना त्यातील भीषणताही जाणवली त्यावर प्रतिक्रिया देतांना ते म्हणालेत 'विषया सांगण्यातून ऐवढी भीषणता जर असेल तर याहून वस्तुस्थिती फार भयावह असेल. प्रत्यक्ष पाहण्यातून मी प्रश्न समजून घेईन असे आश्वासन गांधीनी त्यांना दिले. लखनौ अधिवेशनात चंपारण्याबाबत ठराव मांडल्या गेला, त्यातून शेती, तेथील वातावरण, इंग्रज शासन, याविषयीचे रूदन तेथील आकांत व्यक्त झाला. ठराव मंजूर झाला, परंतु राष्ट्रीय सभा काही करेल याबाबत ते मात्र साशंक होते. (म.गांधी, मुकेश सिंह, वंदना पब्लिकेशन्स, नई दिल्ली, २०१२, पृ.क्र. ३५) राजकुमार शुक्ल यांनी मात्र गांधीशी या विषयावर पाठपुरावा सुरूच ठेवला. गांधीनी कलकत्यावरून तेथील परिस्थिती पाहायला येईल असे म्हटले, राजकुमार शुक्ल स्वत: घेऊन जाईपर्यंत त्यांनी मात्र पिच्छा पुरवला. २७ फरवरी २०१७ ला लिहिलेल्या पत्रात उल्लेख करताना त्यांनी लिहिले, 'किस्सा सुनते हो रोज औरो से, आज मेरी भी दास्तान सुनो' या कवितेच्या ओळीने करून 'मान्यवर महात्मा' असे म्हणत 'आमची दु:खद कहानी त्या दक्षिण आफ्रिकेतील अत्याचारापेक्षाही थोडी अधिकच आहे. चंपारण्याची एकोणवीस लाख दु:खी प्रजा तुमच्या पावलाकडे नजर लावून बसलेली आहे आणि त्यांना आशाच नाही तर पूर्ण विश्वास आहे की, ज्या प्रकारे श्रीरामाच्या चरण स्पर्शाने अहिल्येचा उध्दार झाला त्याच प्रकारे तुम्ही चंपारण्यात पाऊल टाकताच आम्हा एकोणतीस लाख प्रजेचा उध्दार होईल.'' (कहाणी चंपारण सत्याग्रहाची, जयंत दिवाण, अक्षर प्रकाशन, मुंबई २०१६, पृ.क्र.१७) राजकुमार शुक्ल यांच्या प्रयत्नाना यश आलेत. ३ एप्रिल १९१७ ला कलकत्ता येथील कॉंग्रेस बैठकीतून ते गांधीना घेऊन पाटण्याला गेलेत भारतातील पहिल्या सत्याग्रहाचा पाया रोवल्या जाणार आणि नव्या पर्वाचा प्रारंभ होईल असे कुणाच्याच नव्हे तर खुद्द गांधीच्याही ध्यानीमनी नव्हते.

कलकत्याहून गांधी व शुक्ल थेट पाटण्याला राजेंद्रप्रसाद यांच्याकडे गेलेत ते तिथे न भेटल्याने गांधी १० एप्रिल १९१७ ला मुजफ्फरपूर येथील बॅरिस्टर मौलाना मजरूल्लहक यांच्याशी भेट घेतली व येथील प्रश्न, कायदे, शासन भूमिका समजून घेतली. गांधीच्या भूमिकेत सुरूवातीपासूनच शासकीय अधिकारी व शेतकरी यांच्याकडून समस्या समजून घेण्याबाबत ठाम होते. एका अर्थाने या प्रश्नाचा अभ्यास करण्यावर व त्याचा अहवाल ब्रिटिश सरकार, बिहार गव्हर्नर यांच्याकडे पाठवून त्यावर तोडगा काढणे हाच होता. गांधीच्या सुक्ष्म निरिक्षणात एक बाब निश्चित आलेली होती व ती म्हणजे येथील शेतीचे मालक कोठीवाले शासनाला अव्हेरून आपली दंडेलशाही अनेक वर्षापासून बिनदिक्कत राबवित आहेत. स्थानिक अधिकाऱ्यांना घेऊन ते शेतकऱ्यावर जुलुम-जबरदस्ती करतात, तालुक्याच्या



Scanned with CamScanner

न्यायालयापर्यंत त्यांची पोहच असून संपत्तीच्या जोरावर नियमांना बगल देत आहेत, जिल्हा, प्रांत अथवा देशपातळीवरील यंत्रणा अनभिज्ञ असल्याने वा सोयीस्कर दुर्लक्ष झाल्याने प्रश्न चिघळल्याचे गांधीच्या लक्षात आले. या प्रश्नाला संपूर्णत: भिडायचे असेल तर द. आफ्रिकेतील अनुभवाच्या आधारे येथील वातावरण निर्मिती करणे व राष्ट्रीय सभेला या आंदोलनापासून अलिप्त ठेवणे या दोन मुख्य मुद्यावर त्यांनी लक्ष केंद्रीत करून या प्रश्नाचा तळ खंगाळण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला.

**चंपारण सत्याग्रहातील गांधीची भूमिका :**

गांधीनी संपूर्ण भारत पालथा घातल्या असल्याने त्यांना येथील जमिनीवरील वस्तुस्थिती माहिती होती. चंपारण्य आंदोलनाच्या काळातील त्यांचा पेहरावही ग्रामीण, खेडूत शेतकरी यांना जवळचा वाटणारा होता. गांधीना जनमानस सोबत येईल याचा विश्वास असला तरी त्यांना हा प्रश्न अहिंसक आणि सत्याग्रहाच्या मार्गाने सोडवायचा होता व त्याकरीता येथील लोकांमध्ये या आयुधाबाबत विश्वास कसा निर्माण करावा त्यांना तयार कसे करावे हा होता. कारण अशाच प्रश्नाबाबत बंगालात उठाव झाला व तो मोडूनही टाकण्यात आल्याने त्यानंतर शेतकऱ्यांची पूर्वीपेक्षाही अधिक दयनीय स्थिती झाली याचे चित्र त्यांना माहिती होते. त्यामुळे येथील समस्येबाबत ते स्वत:च्या आयुधामार्फत लोकांना घेऊन लढण्याचा विचार करीत होते. अहिंसेमध्ये सर्वच प्रकारची हिंसा वर्ज्य मानल्या गेली होती तर सत्याग्रहात सत्याकरीता आग्रह धरावयाचा परंतु त्यात क्रोध, द्वेष, अत्याचार, शोषण, उन्माद असता कामा नये. निष्क्रीय प्रतिरोध व सत्याग्रह यामध्ये महद अंतर आहे. निष्क्रीय प्रतिरोधात व्यक्तीच्या मनातील संताप, द्वेष, घृणा यशस्वीनंतरही कायम राहते तर सत्याग्रहात याला अटकाव असून आपल्या न्यायतेसाठी नैतिक दबावाचे स्वरूप निर्माण केले पाहिजेत. (गांधी अध्ययन, मनोज सिन्हा, ओरीयन्ट पब्लिकेशन, दिल्ली, २०१६, पृ.क्र. १३) चंपारण आंदोलन प्रसंगात गांधीना जिल्हाबंदी करण्यात आली. गांधीचे एकूणच व्यक्तीमत्व आणि आंदोलनाचा द. आफ्रिकेतील पूर्वानुभव यामुळे गांधी सत्याग्रह करतील आणि कायदेभंग घडवून आणतील त्यामुळे त्यांच्या अटकेबाबत प्रशासन जागृत होते. गांधीच्या नियोजनाचा भव्य प्रामुख्याने अभ्यास करणे, अहवाल तयार करणे, निवेदन स्वीकारणे, त्याची तर्कसंगती लावणे यावर होता.

त्यावेळी गांधीनी द. आफ्रिकेतील आंदोलन कार्याची सविस्तर माहिती सत्याग्रही यांना दिली. गांधी तुरूंगात गेल्यानंतरही सत्याग्रहींनी नेटकेपणाने आंदोलन चालविले होते. त्यात यशही प्राप्त केले. त्याची पुनर्रावृत्ती येथे झाल्यास येथील स्वातंत्र्य आंदोलनाला नवी दिशा मिळेल याबाबत त्यांचा कयास होता. तो पुढे चालून आंदोलनातील प्रारंभ म्हणून चंपारण्याचा लढा ऐतिहासिक ठरला. गांधीना त्यांच्या सहकाऱ्यांनी आश्वस्त केल्यानंतर त्यांनी लढयाची मार्गदर्शक तत्व निर्माण करून लोकलढयाचे स्वरूप निश्चित केले.

**मार्गदर्शक तत्वे :**

चंपारण्याची चळवळ गांधीच्या भारतातील चळवळींचा प्रारंभबिंदू होती. त्यांची साधनाप्रती असणारी निष्ठा बाधित होऊ नये या करीता त्यांनी सात मार्गदर्शक तत्वे मांडलीत त्या आधारावर चळवळीचा पाया उभा करण्यात आला.

१) या चळवळीला उघड राजकीय स्वरूप द्यायचे नाही आणि त्यात कॉंग्रेस पक्षाचे नाव घ्यायचे नाही.

२) चळवळ करणाऱ्या कार्यकर्त्यांनी चळवळींची व्याप्ती त्यात इतर विषयांचा समावेश करून वाढू द्यायची नाही.

३) चळवळीचा उद्देश व कार्यक्रम गुप्त ठेवायचा नाही आणि त्याबाबतची सर्व माहिती जिल्हाधिकाऱ्यांना कळवायची.

४) अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी लढाईपासून माघार घ्यावयाची नाही आणि जे काही क्लेश सासावे लागतील त्यासाठी तयार राहायचे. तुरूंगात जावयाचे असल्यास तुरूंगात जायचे पण मळेवाल्यांबद्दल आपल्या मनात वैरभाव ठेवायचा नाही.

५) चळवळ करणाऱ्यांनी शेतकऱ्यांपासून अलग न राहता त्यांच्याबरोबर रहावे, स्वावलंबी जीवन जगावे, गांधी वा अन्य नेते पकडल्या गेलेत तर दुसऱ्या फळीतील नेत्यांनी चळवळ चालू ठेवावी.

६) चळवळींची उद्दिष्टये सुरूवातीला माफकच असावी, वाटाघाटीसाठी व समझोत्यासाठी तयार असावे.

७) सत्याग्रहासोबत कार्यकर्त्यांनी रचनात्मक कामात आपणास गुंतवून घेतले पाहिजे. सत्याग्रह आणि रचनात्मक कार्यक्रम या एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. (पूर्वोक्त, जयंत दिवाण, पृ.क्र. १०-११)

चळवळीतील कार्यकर्त्यांकरीता एक संहिता देऊन प्रत्यक्ष सत्याग्रहाला प्रारंभ होणार होता. चंपारण्यात गांधीचा प्रवेश १० एप्रिल १९१७ ला झाला तर समितीबाबत निर्णय १६ ऑक्टोबर १९१७ ला झाला त्यानंतर तेथेच आश्रम स्थापून पुढील रचनात्मक कार्य त्यांनी सुरू केले. त्या कार्याचा श्रीगणेशा मात्र चंपारण्यातील निळ शेतकऱ्याच्या लढयाला मिळालेल्या यशानंतरच निर्माण झाला. चंपारण्यातील प्रवेशावर मोतीहारीतील जिल्हाधिकाऱ्याने प्रतिबंद आणला व तेथील स्थिती परिस्थितीबाहेर जाऊ नये याकरिता पकड वारंट बजावण्यात आले. गांधीना मॅजिस्ट्रेट समोर हजर करण्यात आले. त्यात युक्तीवाद करताना गांधी म्हणालेत 'मी कायद्याचे पालन करणारा नागरिक आहे. म्हणून माझ्यावर बजावलेल्या हुकुमाचे पालन करावे अशी माझी प्रथम प्रेरणा होती. कायद्याचे पालन केले तर कर्तव्य करणे शक्य नव्हते म्हणून मला हुकुम पाळणे शक्य नव्हते. जनतेमध्ये राहिल्यानेच मी त्यांची सेवा करू शकेन, असे मला वाटल्याने मी येथून आपखुशीने बाहेर जाऊ शकत नाही या कर्तव्याच्या संघर्षात, यांच्यापासून मला दूर नेण्याची जबाबदारी मी शासनसंस्थेवरच टाकू शकतो. (कित्ता पृ.क्र. ३९) गांधीनी उघडपणे कायदेभंग केलेला होता व चंपारण्य सोडून जाण्यास नकार दिला. मॅजिस्ट्रेट समोरील निवेदनात त्यांनी केलेल्या कर्तव्याबाबत अधिकाधिक शिक्षा द्यावी असे म्हटल्याने मॅजिस्ट्रेट, नेते, जनता सर्वच अवाक झाली. भारतात हे प्रथमत:च घडले होते



Scanned with CamScanner

की, केलेल्या कर्तव्याबाबत कुणी तरी जनतेकरीता कठोर शिक्षेची मागणी करतोय, जनतेत सहकार्याची मोठी लाट यामुळे निर्माण झाली आणि गांधीचा प्रवेशही निर्धोक ठरला. गांधींनी शेतकऱ्यांच्या स्थितीचा अभ्यास याकरिता इंग्रज अधिकाऱ्यांची ना नव्हती उलट गांधीच्या प्रवेशाचे व त्यांच्या कार्याचे कौतुकच झाले. मुळातूनच शोषक असलेल्या मळेवाल्यामध्ये मात्र घबराट निर्माण झाली. वृत्तपत्राची सोबत करून या प्रश्नाला वेगळे रूप देण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यात त्यांना यश आले नाही. सत्याग्रहाची सनदशीर भूमिका, जनतेचे सहकार्य वस्तुस्थितीदर्शक पुरावे यामुळे शासनाला अंतिमत: एक समिती स्थापन करावी लागली व त्यात गांधीना मान्यवर सदस्य म्हणून घेण्यात आले. ही घटनाच देशपातळीवर लक्षवेधक ठरली. गांधी नेतृत्व उदयास येतानाच आंदोलनाच्या यशातून शेतकऱ्यांची झालेली सुटका, २५ प्रतिशत सारा परत करण्यास मळेवाल्यांनी दिलेली स्वीकृती गांधीच्या नियोजनात्मक आखणी, धाडस-धैर्य, सत्यात्मकता यांचा प्रत्यवाच होता. सनदशीर कार्याची त्यांची भूमिका प्रभावी ठरली व चंपारण्याचा सत्याग्रह जागतिक पातळीवर चर्चेचा, संशोधनाचा विषय ठरला. बंड, विद्रोह, लष्करी सामर्थ्य, उठाव यांच्यामार्फतच सुव्यवस्थित यंत्रणा उभी करता येते हा अनेक शतकापासूनचा प्रवाद गांधीनी मात्र वेगळया मार्गावर नेऊन ठेवला, त्यामुळेच वसाहतिक देश असोत वा गुलामीतील राज्य यांना नवे साधन, माध्यम प्राप्त झाले. चंपारण्य शतकभरानंतरही अद्यापही चर्चेत आहे. त्यामागे ही मोठी पार्श्वभूमी होय. नेतृत्व व कार्यकर्ते यांचा संयम, परस्परावरील विश्वास, अतूट श्रध्दा यांचा परिपाक दिसतो.

**मूल्यांकन :**

चंपारण्याच्या लढ्याने भारताला काय दिलेत? हा सर्व साधारणपणे प्रश्न विचारल्या जातो त्याचे उत्तर अनेक मान्यवरांच्या प्रतिक्रियेत दडलेले आहे. मुळातूनच गांधीचा द. आफ्रिकेतील प्रयोग व भारत यामध्ये महद अंतर होते. द. आफ्रिकेत हिंदी लोक अल्पसंख्याक होते. निरिक्षरता, दारिद्र्य, फसवणूक, करारातील जाचक अटी यांचा गैरफायदा आणि लढ्याला पोषक नेतृत्व नव्हते. अल्पसंख्याक असले तरी उपरे म्हणून त्यांच्यात काही बाबतीत ऐक्य होते. त्या तुलनेत येथील स्थिती भिन्न होती. येथे राज्यकर्ते अल्पसंख्य व भारतीय बहुसंख्य होते. ते विविध भागात विभाजीत होते. परंपरा, श्रध्दा, धर्म, प्रांत, जातीयता, लिंग यामधील विषमता ठळकपणे जाणवणारी होती. वर्णव्यवस्था व त्याचा नेतृत्वावरील प्रभाव, नेतृत्व संख्या लक्षनिय होती. प्रत्येक नेत्याचा एक कप्पा व त्यांचा गोतावळा होता. शोषीत, वंचित, शेतकरी, मजूर, कष्टकरी, कामगार यांच्या वेदना समजून घेणारी कणव नेतृत्व नव्हती. विशेषत: भारतीय माणसे आपल्यावरील गुलामी टाकून देण्याकरीता एकत्र येथील का याबाबतच आशंका होती या पार्श्वभूमीवर गांधीच्या चंपारण्य लढ्याचे मूल्यांकन महत्वाचे आहे. वर्णिय परंपरेतील उतरंडीत निम्न स्तरावर असणाऱ्या गांधीना सहकारी व जनता यांच्यात विश्वास पेरण्यासोबतच अनोख्या अशा सत्याग्रहाच्या साधनाकरीता उद्युक्त करणे सर्वस्वी जिकरीचे होते. गांधीनी राष्ट्रीय सभेला बाहेर ठेवून हा लढा लढला. राष्ट्रीय सभेला बाहेर ठेवण्यामागे त्यांची भावना अपयश आल्यास सभेला गालबोट लागेल व दुसरे म्हणजे गांधीनी स्वत:हून या लढयाकरीता लक्ष घालण्याबाबत दिलेले आश्वासन यामुळे गांधीच्या कौशल्याचा यात कस लागणार होता. गांधीनी अभ्यासपूर्वक येथील स्थिती अवलोकन केली व येथे कार्य करण्यास फार मोठा वाव आहे असे जाणवले. त्यांनी नियोजन केले. सहकारी गोळा केलेत. धाडस धैर्य दाखविले. शासनामध्येही त्यांच्या प्रती विश्वास निर्माण केला. कायदेभंग कर्तव्याकरीता आहे व शोषणाच्या विरोधात लढा असल्याचे सप्रमाण मांडलेत त्यामुळे कोठीवाले, वृत्तपत्रे यांचा रोष असला तरी चळवळीला यश मिळालेत. गांधीचे नेतृत्व उदयस आलेत. राष्ट्रीय सभेच्या विषय पत्रिकेत शेतकरी आला. साध्य-साधने याबाबत आशावाद जागा झाला. अहिंसेची भूमी तयार होऊ शकते या प्रयोगाला बळ मिळालेत. लोकमान्य टिळकांच्या हयातीत गांधी नावाचे वलय तयार होऊ लागले. विशेषत: शाश्वत व दिर्घसूची रचनात्मक कार्याचा पाया घातल्या गेला. मुख्य प्रश्नाबाबत निर्माण झालेली कारणे शोधून त्यावर प्रभावी उपचारात्मक पध्दती तयार करण्यात आली. भारतात पहिल्यांदा वेगवेगळया सेवांकरीता सेवेकऱ्याचे स्थलांतरण होऊन एकजीनसी समाज, राष्ट्र व्यवस्था यांचा पाय रचल्या गेला. गांधीनी महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक येथून सेवेला आवश्यक मनुष्यांची रसद बोलावून नव्या भारताच्या उभारणीचा प्रयोग या निमित्याने घडविला. चंपारण्याच्या लढयाचे पैलू बहुआयामी आहेत, त्यामुळे भारतातील गांधी व्यक्तीमत्वाचा परिचय या निमित्याने झाला नाही. तसेच भारत बांधणीच्या दृष्टिने आणि सभेला लोकचळवळ जोडण्याच्या दृष्टीने महत्वाची ठरली. वर्तमानातही जेवढया चळवळी गांधी विचारावर होतांना दिसतात त्यात चंपारण्याचा आकृतीबंध दृष्टिपथास येतो. जेथे हा आकृतीबंध भरकटला तेथे मात्र चळवळीचे भवितव्य खुंटीला बांधल्या गेल्याचे लक्षात येते. चळवळीचा प्रश्न किती सत्यात्मक आहे यावरून, त्याचप्रमाणे राज्यकर्ते, जनता कशी आहे यावर प्रश्नाच्या फलश्रृतीचे भवितव्य ठरताना दिसते. गांधीनी मात्र नैतिक अधिष्ठान चळवळीचा मूलमंत्र असतो हे प्रयोगात्मक सिध्द केल्याने या चळवळीचे महत्व अधोरेखित झालेले आहे. आँग साँग सू की ने १६ सप्टें. २०१२ ला कोलंबीया विद्यापीठातील विद्यार्थ्यांना संबोधित करतांना सांगितले, गांधी से पहले किसी ने भी अहिंसा के जरिए बदलाव लाने की बात नही सोची थी, आज मै जो भी हूँ, गांधी के विचारों से हूँ''. (वर्तमान वैश्विक परिदृश्य में गांधी एव जे. के. मेहता के विचारों की उपादेयता, डॉ. आर. एन. सिंह, डॉ. चंन्द्रिका नाचपाणी, अध्ययन पब्लिशर्स, नई दिल्ली, २०१३, पृ.क्र. ११)



Scanned with CamScanner